# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

CAM Cycling Association Of Maharashtra

संलग्न: सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन
पत्रव्यवहाराचा पत्ता: ईशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगांव, अहमदनगर ४१४ ००१
ई मेल: cyclingassociationmaharashtra@gmail.com मोबाईल क्र.: ७३८ ५०८ १२७० ; ९४२ २३३ ६८०८
सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अंतर्गत नोंणी क्र: 694/16 & F/24689

**अध्यक्ष:** ॲड विक्रम रोठे **संघटन सचिव:** प्रताप जाधव **सचिव:** प्रा. संजय साठे **खजिनदार:** भिकन अंबे


## : अत्यंत महत्वाचे तातडीचे परिपत्रक - ई मेलद्वारे :

## "राष्ट्रीय MTB स्पर्धेसाठी दुसरी निवड चाचणी स्पर्धा"

दिनांक: २३ सप्टेंबर २०२१

प्रती,
**मा. अध्यक्ष / मा. सचिव,**
सर्व जिल्हा संघटना

स. न. वि. वि.

**विषय: १८वी राष्ट्रीय MTB अजिंक्यपद स्पर्धा २०२१ या स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची राज्यस्तरीय दुसरी निवड चाचणी स्पर्धा.**

महोदय / महोदया,

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र दिनांक २७ ते ३१ ऑक्टोबर २०२१ दरम्यान सायकलिंग फेडरेष ऑफ इंडियाच्या मान्यतेने व सहकार्याने १८व्या राष्ट्रीय MTB अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन पुणे, महाराष्ट्रात येथे करणार आहे.

या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या सायकलपटूंची निवड करण्यासाठी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने रविवार दिनांक ०५ स्पटेंबर २०२१ रोजी महाराष्ट्राच्या सर्व ईच्छूक सायकलपटूंची पहिली राज्यस्तरीय खुली निवड चाचणी स्पर्धा आळंदी (देवाची), पुणे येथे घेण्यात आली. या पहिल्या निवडचाचणीमधील वेळेनुसार पात्र स्पर्धकांची यादी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**या स्पर्धेतील महाराष्ट्र संघ निवडण्यासाठी दुसरी निवड चाचणी रविवार दिनांक ०३ ऑक्टोबर २०२१ रोजी आळंदी (देवाची) येथे होईल.**

या निवडचाचणीबीबत पुढील सूचना पूर्णपणे काळजीपूर्वक वाचाव्यात आणि कार्यवाही करावी. सूचना पूर्ण वाचल्यानंतर काही शंका असल्यास श्री. प्रताप जाधव यांचेशी मोबाईलद्वारे संपर्क करावा.

१) सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे (CAM) सन २०२१ साठी नांव नोंदणी कलेल्या सायकलपट्टूंस या निवड चाचणी स्पर्धेमध्ये भाग घेता येईल.

२) ज्या सायकलपट्टूंनी आपल्या जिल्हा सायकलिंग असोसिएशनमार्फत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे नांव नोंदणी (Register) करुन PRIN No. (Provisional Rider's Identifacation Number) घेतला आहे असे सायकलपट्टू या निवडचाचणीमध्ये सहभागी होण्यास पात्र असतील.

३) ज्या सायकलपट्टंनी २०२१ सालामध्ये नोंदणी केलेली आहे (१ जानेवारी २०२१ नंतर) त्यांना पुन्हा नोंदणी करण्याची गरज नाही.

४) ज्या सायकलपट्टूंनी अद्याप सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे नांव नोंदणी केलेली नाही त्यांनी प्रथम आपल्या जिल्हा असोसिएशन मार्फत नोंदणी करुन घ्यावी व नोंदणी केल्यानंतर त्यांना पुढील २४ तासात PRIN (Provisional Rider's Identifacation Number) देण्यात येईल व हा क्रमांक मिळाल्यानंतर त्यांनी चाचणीसाठी नांव नोंदणी करावी. नोंदणी अर्ज जिल्हा असोसिएशकडे किंवा CAM (सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वेबसाऊटवर उपलब्ध आहेत. फॉर्म व योग्य ती नोंदणी रक्कम जिल्हा असोसिएशनकडे जमा करावी

५) नोंदणी क्रमांक - PRIN (Provisional Rider's Identifacation Number) असल्याशिवाय सायकलपट्टूस स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

६) याबाबत सर्व माहीती व अर्ज सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७) सायकलपट्टू नोंदणी अर्ज सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला (CAM) संलग्न असलेल्या जिल्हा सायकलिंग असोसिएशन मार्फतच करावा.

**८) रविवार, दिनांक ०३ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारी निवडचाचणी स्पर्धा पहिल्या निवड चाचणी स्पर्धेच्या ठिकाणी झालेल्या त्या मार्गावरच (Circuit) होईल.**

९) सर्व वयोगटात वैयक्तिक टाईम ट्रायल (Individual Time Trial) प्रकारात निवड चाचणी घेण्यात येईल व सर्वाधिक कमी वेळेत अंतर पूर्ण करणा-या सायकलपटूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी संभाव्य खेळाडूंची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

१०) या निवड चाचणी स्पर्धेसाठी वयोगट पुढील प्रमाणे (१) युथ बॉईज (१४ वर्षाखालील मुले – जन्मवर्ष २००७, २००८ व २००९) (२) सब ज्युनिअर बॉईज ( १६ वर्षाखालील मुले – जन्मवर्ष २००५ व २००६) (३) ज्युनिअर बॉईज ( १८ वर्षाखालील मुले – जन्मवर्ष २००३ व २००४) (४) मेन अंडर २३ (२३ वर्षाखालील पुरुष जन्मवर्ष १९९८,१९९९,२०००,२००१व २००२). (५) मेन ईलीट ( पुरुष खुला गट ( १९ वर्षावरील व ३५ वर्षाखालील वयाचे पुरुष – जन्मवर्ष २००२ व त्याअगोदरचे) (५) युथ गर्ल्स (१४ वर्षाखालील मुली – जन्मवर्ष २००७, २००८ व २००९) (६) सब ज्युनिअर गर्ल्स ( १६ वर्षाखालील मुली – जन्मवर्ष २००५ व २००६) (७) ज्युनिअर गर्ल्स ( १८ वर्षाखालील मुली – जन्मवर्ष २००३ व २००४) (८) वुमेन ईलीट ( महिला खुला गट ( १९ वर्षावरील व ३५ वर्षाखालील वयाच्या महिला – जन्मवर्ष २००२ व त्याअगोदरचे)

**११) दुस-या निवड चाचणीमधून राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणा-या संभाव्य सायकलपट्टूंची यादी तयार करण्यात येईल.**

१२) प्रत्येक सायकलपटूची सायकल स्वत:ची असली पाहिजे व हेल्मेट शिवाय निवड चाचणीमध्ये भाग घेता येणार नाही.

१३) भारतीय सायकलिंग महासंघ CFI (सी.एफ.आय.) आणि CAM यांनी केलेल्या नियमांनुसार तसेच या नियमांत वेळोवेळी केलेल्या बदलानुसार ही निवड चाचणी घेण्यात येईल.

१४) परीस्थीती व गरजेनुसार निवड चाचणीच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो जो सर्वांवर बंधनकारक राहील.

**१५) सध्याच्या कोविड - १९ महामारीच्या परिस्थीतीमध्ये राज्य शासन, स्थानिक प्रशासन व पोलीस प्रशासन यांनी दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करणे सर्वांवर बंधनकारक राहील. जे सहभागीर्थी पालन करणार नाहीत त्यांचा राष्ट्रीय स्पर्धेतील प्रवेश रद्द करण्यात येईल.**

**१६) प्रत्येक सायकलपटूची सायकल स्वत:ची असली पाहिजे. एक सायकल दोघांत वापरावयाची असेल तर रुपये ५०० आगावू भरुन तशी लेखी परवानगी घ्यावी लागेल. एक सायकल जास्तीत जास्त दोघांतच वापरता येईल.**

१७) शनिवार दिनांक २ ऑक्टोबर २०२१ रोजी स्टार्टिंग ऑर्डर जाहीर करण्यात येईल व त्याप्रमाणे स्पर्धा पार पडेल.

१८) हेल्मेट शिवाय निवड चाचणीमध्ये भाग घेता येणार नाही. प्रत्येकाचे स्वत:चे हेल्मेट आवश्यक आहे.

१९) एका सायकलपट्टूस एकाच वयोगटात सहभागी होता येईल. (याबाबत अंतिम निर्णय CAM चा असेल. राष्ट्रीय स्पर्धेत अपवादात्मक परिस्थीतीत बदल करण्याचे अधिकार CAM ला आहेत.)

२०) स्पर्धे ठिकाणी वा स्पर्धे दरम्यान कसल्याही प्रकारची हरकत असेल तर मुख्य पंचांकडे रुपये ५०० (रुपये पाचशे) रोख भरुन घेता येईल. या हरकतीवर CAM कडून निर्णय कळविण्यात येईल.

२१) निवड चाचणीमध्ये सर्व स्पर्धकांना स्वखर्चाने सहभागी व्हावे लागेल. कोणताही खर्च आयोजक / समिती उचलणार नाही. स्पर्धा नोंदणी / खर्च फी प्रत्येकी रुपये ५००/- राहील.

२२) महाराष्ट्राचे जे सायकलपट्टू त्रिवेंद्रम (केरळ), नवी दिल्ली, पतियाळा (पंजाब) व गुवाहाटी (आसाम) येथील राष्ट्रीय अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेत आहेत ते थेट दुस-या निवड चाचणीसाठी पात्र आहेत.

२३) दुस-या चाचणीसाठी पात्र न ठरलेल्या किंवा कोणत्याही कारणामुळे पहिल्या निवड चाचणी स्पर्धेत सहभागी न झालेल्या सायकलपट्टूस जर या दुस-या चाचणी स्पर्धेत भाग घ्यायचा असेल तर रुपये २,५००/- नोंदणी / खर्च फी द्यावी लागेल. जी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या पुढील बँक खात्यात जमा करायची आहे. (रोख पैसे देऊ नयेत).

i) बँकेचे नांव : Bank of Maharashtra
ii) खात्याचे नांव : Cycling Association of Maharashtra
iii) खाते क्रमांक : 60307471103
iv) ब्रँच नांव : Pune Overseas, F C Road, Pune
v) IFSC Code : MAHB0001144
vi) खाते प्रकार : Saving

२४) **योग्य फीसह प्रवेश अर्ज शुक्रवार दिनांक १ ऑक्टोबर २०२१ पर्यंत स्वीकारले जातील. प्रवेश अर्जाची लिंक CAM च्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

२५) आपल्या जिल्ह्यामधील पात्र व ईच्छूक सर्व सायकलपटूंना या निवड चाचणीच्या नियमांपासून अवगत करावे व सहकार्य करावे. प्रवेशिका वेळेत पाठविण्याची काळजी घ्यावी.

कळावे, धन्यवाद !!

आपल विनीत

| | |
|---|---|
| प्रताप जाधव | प्रा. संजय साठे |
| संघटन सचिव | मानद सचिव |

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:

१) ॲड. विक्रम रोठे .... अध्यक्ष, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

२) मा. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे

३) मा. प्राचार्य, पुणे क्रीडा प्रबोधिनी, पुणे

# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र



१८ व्या राष्ट्रीय एमटीबी अजिंक्यपद स्पर्धेसाठी संभाव्य महाराष्ट्र संघ निवडण्यासाठी आळंदी (देवाची), जिल्हा- पुणे येथे **रविवार, दिनांक ०३ ऑक्टोबर २०२१** रोजी होणा-या **दुस-या** राज्यस्तरीय पात्र व खुल्या निवडचाचणी स्पर्धेसाठी वयोगट व अंतर.

Age group and distance for the **Second** State Level Qualified and Open Selection Trials to be held on **Sunday 03rd October 2021** at **Alandi (Devachi)** to select potential Riders for Maharashtra team for the 18th National MTB Championship.

| अ.क्र.<br>Sl No | वयोगट<br>Age Group | पात्र जन्मसाल<br>Eligible birth year | एकूण अंतर<br>Total Distance | लॅप्स<br>Laps |
|---|---|---|---|---|
| १<br>1 | EM : Elite Men & EW : Elite Women<br>१९ ते ३५ वर्षादरम्यान जन्मलेले महिला आणि पुरुष | १९ ते ३५ वर्षा दरम्यानचे पुरुष व महिला. (सन २००२ आणि त्याअगोदर जन्मलेले) | पुरुषांसाठी :३२.४ कि. मी.<br>For Men: 32.4 Kms | ५.४ किमी चे ६ लॅपस<br>6 Laps of 5.4 Km each. |
| | **Men and Women aged between 19 to 35 Years.** | **Men and Women aged between 19 to 35 Years. (Born 2002 and earlier)** | महिलांसाठी: २१.६ कि. मी.<br>For Women: 21.6 Km | ५.४ किमी चे ४ लॅपस<br>4 Laps of 5.4 Km each |
| २<br>2 | MU 23: Men U/23<br>२३ वर्षाखालील पुरुष.<br>Men Under 23 yrs. | १९९८,१९९९, २०००, २००१ व २००२ या वर्षामध्ये जन्मलेले केवळ पुरुषांसाठी.<br>Men Born in 1998,1999, 2000, 2001 and 2002. | पुरुषांसाठी :३२.४ कि. मी.<br>For Men: 32.4 Kms | ५.४ किमी चे ६ लॅपस<br>6 Laps of 5.4 Km each. |
| ३<br>3 | MJ : Men Junior.<br>वय वर्ष १७ आणि १८.<br>Aged 17 and 18 years. | २००३ आणि २००४ या वर्षात जन्मलेले मुले आणि मुली.<br>Boys & Girls Born in 2003 and 2004. | मुलांसाठी : २१.६ कि. मी.<br>For Boys: 21.6 Km | ५.४ किमी चे ४ लॅपस<br>4 Laps of 5.4 Km each |
| | WJ: Women Junior.<br>वय वर्ष १७ आणि १८.<br>Aged 17 and 18 years | | मुलींसाठी : १६.२ कि. मी.<br>For Girls: 16.2 Km | ५.४ किमी चे ३ लॅपस<br>3 Laps of 5.4 Km each |
| ४<br>4 | Sub Juniors Boys and Girls.<br>वय वर्ष १५ आणि १६. | २००५ आणि २००६ या वर्षात जन्मलेले मुले आणि मुली.<br>Boys & Girls Born in 2005 and 2006. | मुलांसाठी : १०.८ कि. मी.<br>For Boys: 10.8 Kms | ५.४ किमी चे २ लॅपस<br>2 Laps of 5.4 Km each |
| | Aged 15 and 16 years. | | मुलींसाठी : १०.८ कि. मी.<br>For Girls: 10.8 Kms | ५.४ किमी चे २ लॅपस<br>2 Laps of 5.4 Km each |
| ५<br>5 | Youth Boys and Girls.<br>वय वर्ष १२, १३ आणि १४. | २००७, २००८ आणि २००९ या वर्षात जन्मलेली मुले आणि मुली. | मुलांसाठी : १०.८ कि. मी.<br>For Boys: 10.8 Kms | ५.४ किमी चे २ लॅपस<br>2 Laps of 5.4 Km each |
| | Aged 12, 13 and 14 years. | Boys & Girls Born in 2007, 2008 and 2009. | मुलींसाठी : १०.८ कि. मी.<br>For Girls: 10.8 Kms | ५.४ किमी चे २ लॅपस<br>2 Laps of 5.4 Km each |

**Pratap Jadhav**
Org. Secretary

**Prof. Sanjay Sathe**
Secretary

# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र



## Time Table & Other Information of Trials

| Sr. No. | Age Group | Reporting / BIB Collection | Event Start Time | Lap Dist. Km | Total Lap Nos. | Total Distance Km | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Training | 7:00 am | 7:00 am to 8:00 am | | | | |
| 2 | Meeting of all age group of Riders. | 8:05 am | 8:00 am to 8:15 am | | | | |
| 3 | Reporting and BIB Distribution. | 8:15 am | 8:15 am to 8:30 am | | | | |
| 4 | Youth Girls. | 8:15 am | 8:40 am | 5.4 | 2 | 10.8 | |
| 5 | Sub Junior Girls. | 8:15 am | in Continutation | 5.4 | 2 | 10.8 | |
| 6 | Youth Boys. | 8:30 am | in Continutation | 5.4 | 2 | 10.8 | |
| 7 | Sub Junior Boys. | 8:30 am | in Continutation | 5.4 | 2 | 10.8 | |
| 8 | WJ : Women Junior. | 9:00 am | After Sub Jr Boys trials over. | 5.4 | 3 | 16.2 | |
| 9 | MJ : Men Junior | 9:00 am | 10 minutes after last WJ rider starts. | 5.4 | 4 | 21.6 | |
| 10 | EW : Elite Women | 9:30 am | in Continutation | 5.4 | 4 | 21.6 | |
| 11 | MU 23: Men U/23 | 9:30 am | After EW trials over. | 5.4 | 6 | 32.4 | |
| 12 | EM : Elite Men | 9:30 am | in Continutation | 5.4 | 6 | 32.4 | |
| | Announcement of results immediately after the end of Youth Boys Trials. | | | | | | |

- जिल्हा प्रशासन किंवा पोलीस प्रशासन यांच्या सूचनेवरुन किंवा आयत्यावेळी उद्भवणा-या काही महत्वपूर्ण कारणामुळे वरील वेळापत्रकात बदल होऊ शकतात जे सर्वांवर बंधनकारक असतील.
- At the suggestion of the District Administration or the Police Administration or due to some important reason arising in the future, there may be changes in the above schedule which will be binding on all.

प्रताप जाधव
संघटन सचिव

प्रा. संजय साठे
मानद सचिव

# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

संलग्न: सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन
पत्रव्यवहाराचा पत्ता: ईशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगांव, अहमदनगर ४१४ ००१
ई मेल: cyclingassociationmaharashtra@gmail.com मोबाईल क्र.: ७३८ ५०८ १२७० ; ९४२ २३३ ६८०८
सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अंतर्गत नोंणी क्र: 694/16 & F/24689

**अध्यक्ष:** ॲड विक्रम रोठे **संघटन सचिव:** प्रताप जाधव **सचिव:** प्रा. संजय साठे **खजिनदार:** भिकन अंबे


दिनांकः / /२०२१

प्रती,
मा. सचिव,
सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

**विषयः एक सायकल दोघांमध्ये वापरण्याबाबत….**

महोदय,

रविवार, दिनांक ३ ऑक्टोबर २०२१ रोजी आळंदी येथे होत असलेल्या दुस-या राज्यस्तरीय एमटीबी निवडचाचणीमध्ये आम्ही खालील दोघे एकच सायकल वापरणार आहोत. यासाठी आवश्यक फी CAM च्या बँक खात्यात जमा केली आहे.

| अ.क्र. | सायकलपट्टूचे नांव | जिल्हा | वयोगट |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

बँकेत पैसै भरल्याचा तपशील.

………………………………………………………………………………………………………

१) सायकलपट्टू क्र.१ ची सहीः …………………………………………………….

सायकलपट्टू क्र १ चे नांवः …………..……………………………………………….

२) सायकलपट्टू क्र.२ ची सहीः …………………………………………………….

सायकलपट्टू क्र २ चे नांवः ……………………………………………………….